# चिकाटीने अभ्यास केल्यास यश निश्चित

## दिनार म्हार्दोळकर : अंबिये महाविद्यालयात ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती प्रदान सोहळा उत्साहात

*टीम दैनिक हेराल्ड*



विर्नोडा : शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांसोबत प्रमुख पाहुणे दिनार म्हार्दोळकर, प्राचार्य जुवांव कोस्टा आणि संयोजक प्रा. आनंद कोळंबकर.

**विर्नोडा, दि. ३१ :** विद्यार्थ्यांनी त्यांच्या शैक्षणिक प्रवासात चिकाटीने अभ्यास केल्यास यश निश्चितपणे प्राप्त होते, असे प्रतिपादन दिनार म्हार्दोळकर यांनी केले. संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयात आयोजित केलेल्या ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा आणि संयोजक प्रा. आनंद कोळंबकर उपस्थित होते.

संत सोहिरोबानाथ अंबिये शासकीय कला आणि वाणिज्य महाविद्यालय, विर्नोडा-पेडणे येथे महाविद्यालयातील परिसंवाद सभागृहात ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती वितरण समारंभ यशस्वीरित्या पार पडला. या सोहळ्यात शैक्षणिक उत्कृष्टता आणि समर्पणाची दखल घेत विविध वर्गातील १८ पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पुरस्कार प्रदान करण्यात आले. शिष्यवृत्ती समितीचे संयोजक प्रा. आनंद कोळंबकर यांनी शिष्यवृत्ती वितरण समारंभाचे संयोजन केले.

यावेळी प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा यांनी शिष्यवृत्ती प्राप्तकर्त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी वचनबद्ध राहण्यासाठी प्रोत्साहित केले.

**विद्यार्थ्यांना सतत यश मिळावे : प्रा. कोस्टा**

महाविद्यालय सर्व शिष्यवृत्ती प्राप्तकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करते आणि त्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रयत्नांमध्ये सतत यश मिळावे अशी प्रार्थना करतो, असे उद्गार आपल्या मनोगतात प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा यांनी काढले.

# ‘क्यूजीआयएस’मधून विद्यार्थ्यांना होईल ज्ञानप्राप्ती

**प्राचार्य नामदेव गावस : क्यूजीआयएस अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम साखळी सरकारी महाविद्यालयात प्रारंभ**

*टीम दैनिक हेराल्ड*



साखळी : क्यूजीआरएस अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटन समारंभात महाविद्यालयाचे प्रा. डॉ. नामदेव गावस, डॉ. आरती पानशेकर, विषय तज्ज्ञ दीपक कुंभार आणि हेमा सावंत व विद्यार्थी.

**साखळी, दि.३१ :** विद्यार्थ्यांनी त्यांची अभ्यास क्षमता विकसित करण्यासाठी अशा कौशल्य-आधारित कार्यक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी व्हावे, कारण ज्ञान निर्मितीसाठी अशा तांत्रिक कौशल्यांचा वापर अधिक महत्त्वाचा आहे. अशा अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्ती होऊ शकते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी अधिक ज्ञान मिळवण्यासाठी या अभ्यासक्रमासाठी नियमित उपस्थितीत राहावे, असे प्रतिपादन साखळी सरकारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी केले.

भूगोल विभागातर्फे आयोजित केलेल्या क्यूजीआयएस अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटन समारंभातते बोलत होते. भूगोल विभागाने क्यूजीआयएस मधील अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या जिओइन्फॉरमॅटिक्स प्रयोगशाळेत झालेल्या उद्घाटन समारंभात २३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

भूगोल विभागाच्या प्रभारी डॉ. आरती पानशेकर यांनी आजच्या जागतिक पर्यावरणीय समस्यांना तोंड देण्यासाठी क्यूजीआयएसचे महत्त्व अधोरेखित केले. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना नकाशा तयार करणे आणि स्थानिक डेटा विश्लेषण यासारख्या मौल्यवान कौशल्यांनी सुसज्ज करेल, जे पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत, असेही डॉ. आरती पानशेकर म्हणाल्या. विद्यार्थ्यांसोबत जीआयएससंबंधित विस्तृत ज्ञान शेअर केल्याबद्दल त्यांनी विषय तज्ज्ञ दीपक कुंभार आणि हेमा सावंत यांचेही आभार मानले.

कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन सुप्रिया गावकर यांनी केले. विशाल गावकर यांनी आभार मानले. या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना क्यूजीआयएसच्या वापराबद्दल प्रत्यक्ष अनुभव आणि व्यावहारिक अंतर्दृष्टी मिळण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे त्यांची शैक्षणिक आणि व्यावसायिक वाढ होईल.

# गोरक्षकांनी पकडला गोमांसाने भरलेला कंटेनर

*टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव कोकण रेल्वे स्थानकावर ३०० किलो गोमांस जप्त**

**मडगाव, दि.३१ :** मडगावातील कोकण रेल्वे स्थानकावर कोकण रेल्वे पोलिसांनी सुमारे ३०० किलो गोमांस जप्त केले. राजीव झा यांच्या नेतृत्वाखाली गोरक्षकांनी बेकायदेशीरीत्या गोमांस भरून आणलेला गोमांसाचा कंटेनर पकडला. गोव्यात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर गोमांसाची तस्करी सुरू असून, मासळी व इतर ऐवजात ही गोमांस मिसळून आणले जाऊ लागल्याने, या बेकायदेशीर गोमांस तस्करीवर कडक कारवाई करावी, अशी मागणी बजरंग दलातर्फे करण्यात आली आहे.

कोकण रेल्वे पोलिसांनी ३०० किलो गोमांस व १० मासळीचे बॉक्स जप्त केले. मासळी व गोमांस एकत्र करून आणल्याचा आरोप यावेळी बजरंग दलाचे भगवान रेडकर व इतरांनी केला. गोव्यात अधिकृत मांस प्रकल्प असताना बेकायदेशीर गोमांस का आणली जाते असा प्रश्न बजरंग दलाने उपस्थित केला आहे व कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, गोव्यात रेल्वे मार्गे, वाहनांनी बेकायदेशीर गोमांसाची तस्करी वाढली असून, गोमांसाने भरलेला उत्तरप्रदेश नोंदणीचा मोठा कंटेनर गोरक्षक राजीव झा व सहकारी यांनी पकडला. उत्तरप्रदेशमध्ये गोमांसावर बंदी असताना हा कंटेनर येथे कसा पोहोचला, असा राजीव झा यांनी उपस्थित केला.

## पान १ वरून

### ढवळीकर बंधूंवर मंत्री गावडेंचे थेट प्रहार

ढवळीकर बंधूंच्या ताब्यात गेला आहे. काशिनाथ जल्मी, स्व. लवू मामलेदार, नरेश सावळ, बाबू आजगावकर, दीपक पावसकर यांसारख्या नेत्यांनी मगोसाठी झटले होते. तरीदेखील त्यांना पक्ष सोडण्याची वेळ का आली ? याचा विचार करावा लागेल. मगो हा भाऊसाहेबांच्या तळागाळातील जनतेचा पक्ष होता. मात्र, आज तो एका विशिष्ट कुटुंबाच्या नियंत्रणाखाली आहे, अशी टीका त्यांनी केली. राज्यातील आगामी राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष आहे. भाजप-मगो युती टिकणार की दोन्ही पक्ष वेगळी वाट धरतील, हे येत्या काळात स्पष्ट होईल.

### जुन्या गोव्यातील ऐतिहासिक अवशेष नष्ट केल्याचा संशय

तोफगोळे आणि इतर ऐतिहासिक अवशेष नष्ट होण्याची १०० टक्के शक्यता आहे. हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे. स्वतंत्र संशोधक आणि वारसा अभ्यासक लेखिका हेता पंडित यांनीही याबाबत प्रतिक्रिया देताना म्हटले की, हे शक्य आहे की अनेक ऐतिहासिक अवशेष दुर्लक्षितपणे फेकले जात असतील. मी एक संशोधक म्हणून आणि जुन्या गनपावडर कारखान्यातील गिरणीचे दगड वाचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारी व्यक्ती म्हणून सांगू इच्छिते की, सध्याच्या परिस्थितीत ऐतिहासिक माहितीच्या अभावामुळे आपण अनमोल वारसा नष्ट करत आहोत. गोव्याच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाच्या संरक्षणासाठी सरकार आणि संबंधित विभागांनी त्वरित पावले उचलण्याची गरज तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. अन्यथा, राज्यातील मौल्यवान सांस्कृतिक वारसा नामशेष होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### मोठ्या प्रकल्पांसाठी क्षमता अभ्यास अनिवार्य करावा

योजनेंतर्गत गाव विकास आराखडा तयार करत आहेत. भविष्यात परवानगी देणे किंवा नाकारणे यासाठी हा आराखडा अधिकृत आधार म्हणून वापरण्याचा विचार केला जात आहे. कोलवा सिविक अँड कंझ्युमर फोरम ने नमूद केले आहे की, राज्य सरकारच्या नियमानुसार प्रत्येक गावासाठी क्षमता अभ्यास अनिवार्य आहे. काही ग्रामपंचायती विकास प्रकल्पांना पाठिंबा देतात आणि त्यामुळे असे अभ्यास नाकारत आहेत तर काही ग्रामसभा या अभ्यासाची मागणी करत असून, भविष्यातील गाव नियोजन अधिक सुयोग्य करण्याचा प्रयत्न करत आहेत. ग्रामसभांचे हे प्रयत्न यशस्वी ठरले, तर स्थानिक प्रशासनांना विकास प्रकल्पांच्या मंजुरीबाबत अधिक जबाबदारीने आणि वैज्ञानिक आधारावर निर्णय घ्यावे लागतील असे मत पर्यावरण अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

# आंबिये महाविद्यालयात आज विशेष कार्यशाळा; मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

*टीम दैनिक हेराल्ड*

पणजी, दि. ३१: संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथील हिंदी विभाग आणि माजी विद्यार्थी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. १ एप्रिल रोजी करण्यात आलेले आहे. ही कार्यशाळा महाविद्यालयाच्या परिषद सभागृहामध्ये सकाळी ११ वाजता आयोजित केली आहे. या कार्यशाळेचा विषय मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये बातमी लेखन आणि व्हिडिओ संपादन असा आहे. विद्यार्थ्यांना पत्रकारितेतील मूलभूत गोष्टींची ओळख व्हावी या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यशाळेमध्ये मान्यवर तज्ज्ञ म्हणून पत्रकार साहिल नारुलकर आणि व्हिडिओ संपादनातील विशेष तज्ज्ञ जुएल सरकार हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी उद्घाटन समारंभाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जुवांव कोस्टा, हिंदी विभाग प्रमुख अमृता डिंगे, माजी विद्यार्थी विभागाचे प्रमुख डॉ. वीरेंद्र आमोणकर आणि कार्यशाळेच्या मुख्य संयोजिका डॉ. रंजिता परब उपस्थित असतील. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन माजी विद्यार्थी विभागाचे मुख्य समन्वयक डॉ. वीरेंद्र आमोणकर आणि कार्यशाळेच्या मुख्य संयोजिका डॉ. रंजिता परब यांनी केलेले आहे.



मडगाव: बिनविरोध सरपंचपदी निवड झालेल्या मनिषा दिवाकर नाईक देसाई यांचे अभिनंदन करताना माजी उपमुख्यमंत्री चंद्रकांत कवळेकर बाजूला दिवाकर नाईक देसाई, उपसरपंच मेदीनी नाईक, माजी सरपंच शीतल नाईक, माजी सरपंच महेश फळदेसाई व पंच सदस्य अजीमा रिबेलो

# फातर्पा पंचायतीच्या सरपंचपदी मनिषा नाईक देसाई बिनविरोध

*टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि.३१ :** फातर्पा ग्राम पंचायतीच्या सरपंचपदी मनिषा दिवाकर नाईक देसाई यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे या पंचायतीवरील भारतीय जनता पार्टीचे (भाजप) वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. सरपंचपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर सध्या अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

माजी सरपंच शीतल नाईक यांच्या जागी मनिषा दिवाकर नाईक देसाई यांची वर्णी लागली आहे. माजी उपमुख्यमंत्री चंद्रकांत (बाबू) कवळेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. यावेळी उपसरपंच मेदीनी नाईक, माजी सरपंच शीतल नाईक, माजी सरपंच महेश फळदेसाई व पंच सदस्य अजीमा रिबेलो ही उपस्थित होते.

# तिराळीच्या मुख्यकालव्याजवळील रस्त्यावरून होणारी अवजड वाहनांची वाहतूक बंद करा

## हणखणेतील भराडी पाणी वाटप समितीतर्फे आज एकदिवसीय धरणे आंदोलन

*टीम दैनिक हेराल्ड*



पेडणे : धरणे आंदोलनासंबंधीचे निवेदन अधीक्षक अभियंता शिरोडकर यांना सादर करताना गोपाळ नाईक.

**पेडणे, दि. ३१ :** पेडणे तालुक्यातील हणखणे येथील तिळारीच्या मुख्य कालव्याशेजारील रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक सुरू आहे. सदरची वाहतूक तात्काळ बंद करावी. याबाबत हणखणेतील श्री भराडी पाणी वाटप समितीकडून लेखी निवेदन सादर करूनही कारवाई होत नसल्याने उद्या मंगळवार दि. १ रोजी धारगळ येथील जलस्रोत खात्यासमोर एकदिवसाचे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

हणखणे येथे एक सिमेंट काँक्रीटीकरण प्रकल्प असून या प्रकल्पाचे काँक्रीट मिक्सर वाहतूक करणारे जड वाहने तेथील तिळारीच्या मुख्य कालव्याशेजारील रस्त्यावरून नेहमीच होत असते. शिवाय त्या भागात असलेल्या खडी क्रशरसाठी लागणाऱ्या कच्चा मालाची वाहतूक करणारे ट्रक देखील याचा मार्गाने वाहतूक करतात. जड वाहनांमुळे हणखणेतील तिळारी कालव्याला धोका निर्माण झाला असून कोट्यावधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या तिळारीच्या कालव्याच्या काँक्रिटीला उभे तडे गेले आहेत.

याबाबत हणखणे येथील श्री भराडी पाणी वाटप समितीकडून २९ ऑक्टोबर २०२४ रोजी तिळारी कालव्याशी संबंधित जलस्रोत खात्यातील अधीक्षक अभियंते शिरोडकर यांच्याकडे लेखी निवेदन सादर करण्यात आले होते. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी हणखणेतील कालव्याला भेट देऊन कालव्याला गेलेले तडे आणि कालव्याशेजारील रस्त्यावरून होत असलेली वाहतूक याची प्रत्यक्षात पहाणी केली. मात्र त्यानंतर आजपर्यंत त्यावर अपेक्षित कारवाई करण्यात आली नाही.

त्यानंतर हणखणेतील श्री भराडी पाणी वाटप समिती सदस्यांकडून पुन्हा अधिकाऱ्यांची भेट घेऊन चौकशी केली. मात्र, जलस्रोत खात्यातील तज्ज्ञ अधिकाऱ्यांकडून टोलवा-टोलवी करण्यात आली. २०२५ सालचा मार्च महिना संपला तरी अद्याप कारवाई करण्यात आली नाही. म्हणून पाणी वाटप समितीचे गोपाळ नाईक यांनी मंगळवार दि. १ रोजी शेवटी एक दिवसाचे धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेऊन त्याबाबतचे लेखी निवेदन अधीक्षक अभियंता शिरोडकर यांना दिले.

हे आंदोलन जलस्रोत खात्याचे अधीक्षक अभियंता शिरोडकर यांच्या कार्यालयासमोर होणार आहे. त्यानंतरही योग्य कारवाई करण्यात आली नाही. तर भविष्यात आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही समितीने दिला आहे.

**IN THE COURT OF THE MAMLATDAR OF PERNEM TALUKA, PERNEM GOA**

**Case No. MAM / PER / MND / PUR / 5 / 2024**

1. Kanchan Kashinath Dhargalkar alias Kunda Kashinath Dhargalkar, widow of late Kashinath Pandurang Dhargalkar, 72 years in age, widow, Indian National, R/o H. No. 51, Khalchawada, Pernem, Goa 2. Mrs. Kavita Kashinath Dhargalkar alias Kavita Ameya Surlekar, daughter of late Khaxinath Dhargalkar, dentist, 42 age, R/o H. No. 51, Khalcha Wada, Virnoda, Pernem, Goa, Legal Heirs of the deceased Kashinath Pandurang Dhargalkar ....Applicants

V/S

Mr. Moreshwar Sitaram Nadkarni, Major in age, Indian National, r/o Tue m, Pernem, Goa ..... Opponent

To, The opponent

**NOTICE UNDER ORDER V RULE 20 (1-A) of CPC 1908**

Whereas the applicant has filed an application under section 16(1) of Goa Daman and Diu Mundkar (Protection from Eviction) Act 1975.

And whereas the notices were sent to the opponent by registered AD has been returned by the postal authorities with remarks “No such person on address”

And whereas the applicant vide his application dated 07.01.2025 has stated that the applicant tried level best to search the whereabouts or any other address of the opponent, but could not able to trace, therefore they prayed to serve the above opponent by way of substitute service by publishing notice in the daily newspaper.

And whereas after considering the request of the applicant, I have come to the conclusion that this is a fit case for publishing the notice in any local newspaper.

Therefore notice is hereby given under order 20 (1-A) to you to appear in this Court on **17.04.25 at 10.30 am** in person or through duly authorised agent failing which ex-parte order shall be passed and the matter shall be decided in your absence,

Given under my hand and seal of this Court on this 20th day of March 2025.

Sd/- Ranjeet R. Salgaonkar (Seal)
Mamlatdar of Pernem Taluka, Pernem, Goa

# गोव्यात मराठीला सहराजभाषेचा दर्जाच नाही

## अ‍ॅड. शिवाजी देसाई : ब्रह्माकरमळीत माहेर पुस्तकाचे प्रकाशन

*टीम दैनिक हेराल्ड*



ब्रह्मकरमळी : ‘माहेर’ पुस्तकाचे प्रकाशन करताना अ‍ॅड. शिवाजी देसाई, संदीप केळकर, सुमित्रा नाडकर्णी, प्रा. सुषा होंडकर, प्राजक्ता गावकर आणि किशोर केळकर.

**वाळपई, दि. ३१ :** गोव्याच्या सरकारी कार्यालयात सध्याची परिस्थिती ही धड मराठी ही नाही आणि धड कोकणी देखील नाही अशी आहे. गोव्यामध्ये कोणत्याही प्रकारे राजभाषा कायद्याचा योग्य वापर केला जात नाही. आणि जर झाला असता तर सरकारी नोकर भरती आयोगाच्या परीक्षेला कोकणीची सक्ती झालीच नसती आणि त्यामुळे गोव्यामध्ये मराठीला सह राजभाषेचा दर्जाच नाही, असे परखड प्रतिपादन शिवव्याख्याते आणि सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड. शिवाजी देसाई यांनी केले.

ब्रह्माकरमळी सत्तरी येथे गोमंतक मराठी साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित प्राजक्ता गावकर यांच्या माहेर या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात मराठी आणि गोव्याचा इतिहास या विषयावर प्रमुख वक्ते या नात्याने बोलताना केले.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रा. सुषा होंडकर, गोमंतक मराठी साहित्य परिषद अध्यक्ष संदीप केळकर, माहेर या पुस्तिकेच्या लेखिका प्राजक्ता गावकर, नगरगाव पंचायतीच्या माजी सरपंच सुमित्रा नाडकर्णी, किशोर केळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

अँड देसाई म्हणाले की, केवळ मराठी भाषेला राज भाषेचा दर्जा प्राप्त होऊन उपयोगाचे नाही. तर जास्तीत जास्त प्रमाणात मराठी भाषा आपल्याला आपल्या व्यवहारांमध्ये बोलताना वापरता आली पाहिजे. मराठीप्रेमींनी आपल्या दैनंदिन सरकारी कामासाठी मोठ्या प्रमाणात मराठीतून अर्ज सरकार दरबारी करायला हवेत. असे केले तरच सरकारी कार्यालयात मराठी भाषेचा वापर करण्यासाठी सरकार दरबारी दबाव वाढेल.

संदीप केळकर म्हणाले की, गोमंतक मराठी साहित्य परिषदेने पाच वेगवेगळी मराठी भाषेची साहित्य संमेलने घेतली. ही संस्था मराठीच्या चळवळीत सदैव सहभागी होत असते. मराठी ही संस्कारांची भाषा आहे. स्वातंत्र्यापूर्वी गोव्यात मराठी होती. गोव्यातील सरकारांनी मराठीच्या रक्षणासाठी कार्य केले नाही. विद्यमान सरकार मराठी भाषेविषयी उदासीन आहे.

माहेर या पुस्तकावर भाष्य करताना प्रा. सूषा होंडकर म्हणाल्या की या पुस्तकाशी प्रत्येक स्त्री च्या भावना जोडलेल्या आहेत. प्रत्येक स्त्री चे मन कायम माहेरी झेपावत असते. सासर आणि माहेर या दोन्ही नात्यांना स्त्री सांभाळते. या पुस्तकात लेखिकेचे बालपणापासून ते लग्नानंतरचे अनेक अनुभव आहेत. प्रत्येक स्त्रीने हे अनुभव वाचले पाहिजेत आहेत. पुस्तकात पर्यावरण जागृतीचा संदेश आहे. यावेळी सुमित्रा नाडकर्णी, प्राजक्ता गावकर यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. मान्यवरांनी यावेळी प्राजक्ता गावकर यांनी लिहिलेल्या माहेर या पुस्तकाचे प्रकाशन केले. प्रास्ताविक संदीप केळकर यांनी केले. सूत्रनिवेदन किशोर केळकर यांनी केले तर संदेश केळकर यांनी आभार मानले.

# धेंपे उच्च माध्यमिक विद्यालयाची यशाची उज्ज्वल परंपरा कायम

*टीम दैनिक हेराल्ड*

**बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश**

**पणजी, दि. ३१ :** गोवा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावी परीक्षेत कुजिरा येथील वसंतराव धेंपो उच्च माध्यमिक विद्यालयाने कला, विज्ञान आणि वाणिज्य या तिन्ही शाखांमध्ये घवघवीत यश संपादन केले. कला शाखेचा निकाल ९७ टक्के लागला असून वाणिज्य शाखेचा ९६.०८ टक्के तर विज्ञान शाखेचा निकाल ९४ टक्के इतका लागला आहे. एकंदरीत उच्च माध्यमिक विद्यालयाच्या निकालाचे सरासरी प्रमाण ९६ टक्के इतके आहे. कला शाखेत एकूण ६६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २१ विद्यार्थ्यांनी विशेष आणि २२ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवली आहे. वाणिज्य शाखेत एकूण १७९ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी २१ विद्यार्थ्यांनी विशेष आणि ५३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवली आहे. विज्ञान शाखेत उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९४ टक्के असून एकूण १७३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १६ विद्यार्थ्यांनी विशेष आणि ७७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवली आहे. कला शाखेत सान्वी विलास नाईक हिने ६०० पैकी ५६५ गुण मिळवून ९४.१७% टक्के गुण प्राप्त करत प्रथम येण्याचा मान पटकावला. टूलिप परेरा याने ६०० पैकी ५६४ गुण मिळवून ९४ टक्के प्राप्त करत दुसरा क्रमांक पटकावला. तर सिया के. साळगावकर हिने ६०० पैकी ५६१ गुण मिळवून ९३.५ टक्के प्राप्त करत तिसरा क्रमांक पटकावला.

कला शाखेत रीधीमा वेंगुर्लेकर, टूलिप परेरा, सिया साळगावकर, ईशिता जोशी, तियारा परमार, रोल डिसिल्वा, सान्वी नाईक आणि अनुज कुमार यांना राज्यशास्त्रात १००पैकी १०० गुण मिळाले. तसेच इतिहासात रीधीमा वेंगुर्लेकर आणि टूलिप परेरा यांना १००पैकी १०० गुण मिळाले.